मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# तोपर्यंत भारतीय संविधान बदललं जाणार नाही : अजित पवार

## पिंपरीतील एचए मैदानावरील सभेत उपमुख्यमंत्री पवार बोलत होते : विरोधकांकडून भारताचे संविधान बदलणार असल्याचा आरोप सरकारवर केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

विरोधकांकडून भारताचे संविधान बदलणार असल्याचा आरोप सरकारवर केला जातोय. जे मौल्यवान संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेलं आहे. जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे, तोपर्यंत भारतीय संविधान बदललं जाणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी येथे व्यक्त केला.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जन सन्मान यात्रेचे निगडी येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले. निगडी येथून पिंपरीतील एचए मैदानापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. पिंपरीतील एचए मैदानावरील सभेत उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. यावेळी खासदार सुनील तटकरे, रुपाली चाकणकर, आ. बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, नाना काटे आदी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, लाडकी बहिण योजना गरीब महिलांसाठी आहे. केवळ महिला, मुलींनाच नव्हे तर भावांना सुध्दा योजना दिल्या आहेत. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी बांधवांना साडेसात एचपीपर्यंत वीज माफी दिली. आता त्यांनी मागील वीज बिलाची चिंता करायची नाही, यापुढचे बील भरायचे नाही. तसेच, दुधाला पाच हजार रुपये अनुदान सुरु केलं. युवक युवतींना व्यवसायिक प्रशिक्षण देण्याकरिता सहा, सात तसेच आठ हजार रुपये स्टायफंड सुरु केला. सरकारने सुरु केलेल्या योजना पुढील पाच वर्ष सुरु राहणार आहे. लाडकी बहिण योजनेंतर्गत तब्बल ९० लाख महिला भगिनींच्या बँक खात्यात दोन महिन्यांचे पैसे जमा केले. विरोधकांनी ही योजना चुनावी जुमला असल्याचे सांगून राज्य सरकारची बदनामी करण्याचा प्रयत्न केला.

महिलांच्या बँक खात्यात जमा झालेले पैसे पुन्हा सरकार परत घेणार असल्याच्या अफवा पसरवल्या. कोणी जर असं म्हणत असेल तर त्याची जीभ हासडून काढीन. कारण, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, माता रमाई यांच्या विचारांचा वारसा जपणा-या महाराष्ट्रात असे कदापी घडून देणार नाही, असे ही अजित पवार यावेळी म्हणाले.

गॅस सिलींडर योजनाच नव्हे तर रस्ते, रिंगरोड, विमानतळ अशी असंख्य विकास कामे सरकारला करावी लागतात. त्यामुळे राज्य सरकारने तीन घरगुती सिलींडर देण्याची योजना सरकारने आणली आहे. तीन सिलींडरची रक्कम महिलांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना त्याचा लाभ घेता येणार आहे, असे अजित पवार यावेळी म्हणाले. पींक रिक्षाद्वारे महिलांना संधी मिळाल्यानंतर संधीचं त्या सोनं करतात, हे मला त्यांच्याकडून पहायला मिळाले. त्यांच्या रिक्षातून प्रवास करताना पुरुषाला लाजवेल असा प्रकारे अत्यंत स्मूथ रिक्षा त्यांनी चालवला. १७ शहरामध्ये पींक रिक्षा योजना राबविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली आहे.

### झोपडपट्टी निर्मुलन योजना राबवून पक्की घरे

**» झोपडपट्टीमध्ये राहणा-या बंधू भगिनींसाठी झोपडपट्टी निर्मुलन योजना राबवून पक्की घरे बांधली जातील. नुकतेच भाटनगर झोपडपट्टीबाबत निवेदन स्विकारल्यानंतर आयुक्तांची उद्याच बैठक बोलावली आहे. त्यावर त्वरीत मार्ग काढला जाईल. तेथे बांधलेली घरे जीर्ण झाली आहेत. पडझड होत आहे. सुरक्षाभींत नाही, त्याठिकाणी पक्की घरे बांधून देण्याचे काम आपण करणार आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.**

# शाळांच्या दैनंदिन साफसफाई कामात 'रिंग'? सुलभा उबाळे यांचा आरोप

## तातडीने ठोस निर्णय घेऊन गैरप्रकार न थांबवल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा देखील उबाळे यांनी दिला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

भाजप नेत्याशी संबंधित एका ठेकेदार कंपनीने दुसऱ्या (PIMPRI)कंपनीला हाताशी धरून पालिकेतील शाळांच्या दैनंदिन सफाई कामात " रिंग " केली असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे यांनी केला आहे. यावर तातडीने ठोस निर्णय घेऊन गैरप्रकार न थांबवल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा देखील उबाळे यांनी दिला आहे.



पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सुलभा उबाळे बोलत होत्या. यावेळी शिवसेनेचे नेते संजोग वाघेरे पाटील, माजी आमदार अॅड. गौतम चाबुकस्वार, युवा सेना शहर अधिकारी चेतन पवार, युवा सेना जिल्हा अधिकरी सचिन सानप, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट, अनंत कोऱ्हाळे, शहर संघटक संतोष वाळके, तुषार सहाने, भोसरी विधानसभा समन्वयक दादा नरळे आदी उपस्थित होते.

सुलभा उबाळे यांनी सांगितले की, पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील शिक्षण विभागाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेची यांत्रिकीकरणाद्वारे दैनंदिन साफसफाई करण्यात येणार आहे. दैनंदिन साफसफाई कामासाठी सहा कंपन्यांनी निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला. मात्र क्रिस्टल व ब्रिक्स वगळता चार कंपन्यांना अपात्र ठरविण्यात आले. ज्या दोन कंपन्यांना पात्र केले आहे त्यांनी निविदेपेक्षा जास्त दर भरलेले आहेत.

त्यामुळे क्रिस्टल कंपनी ने ब्रिक्स कंपनीला हाताशी धरून रिंग केली असल्याचा गंभीर आरोप उबाळे यांनी केला आहे. पालिकेच्या शिक्षण विभागाच्या दैनंदिन साफसफाई कामासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. यासाठी सहा कंपन्यांनी निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला होता. या निविदेमध्ये अटी शर्ती ठराविक कंपन्यांना डोळ्यासमोर ठेऊन करण्यात आल्या आहेत. निविदा काढून पाच महिने झाल्यानंतर ही त्यावरील निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला. त्याकाळात निविदेत सहभागी असणाऱ्या व पात्र असणाऱ्या इतर ठेकेदारांना कसे अपात्र करता येईल याबद्दल कटकारस्थान करण्यात आले असा आरोप उबाळे यांनी केला आहे.

### आयुक्त वाढीव दराने काम देणार का?

**» दोनच निविदा धारक पात्र केल्यामुळे यावर शिक्कामोर्तब होत आहे की हे काम ब्रिक्स कंपनीला वाढीव दराने मिळणार आहे. यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे इतर कंपन्यांना कठोर नियम लावण्याचे कारण काय आयुक्तांनी स्पष्ट करावे. ज्या ठेकेदार कंपन्यांचे काम सुरू आहे त्यांना पात्र करावे किंवा नवीन टेंडर काढावे. प्रशासक असताना असा कारभार सुरू आहे. आयुक्तांनी प्रशासक म्हणून काम करत असताना अश्या प्रकारच्या जनतेच्या कररूपी पैशाचे नुकसान करू नये, ही निविदा रद्द करावी अन्यथा पात्र अपात्रतेची पडताळणी करून सर्व निविदाधारकांच्या निविदा उघडण्यात याव्यात व जनतेच्या पैशाची लूट थांबवावी. यावर ठोस निर्णय घ्यावा अन्यथा न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागतील असे उबाळे यांनी म्हटले आहे.**

# राजीव गांधी रुग्णालयातील ऑक्सिजन प्लांट कार्यान्वित

## रुग्णांना मिळणार गोल्डन अवरमध्ये उपचार, लहान मुलांच्या अतिदक्षता विभागासाठीही ठरणार उपयुक्त

**पुणे | प्रतिनिधी**

पर्णकुटी चौकातील राजीव गांधी रुग्णालयातील लिक्विड ऑक्सिजन प्लांट तब्बल चार वर्षांनी कार्यान्वित झाले आहे. यासाठी दोन कोटी रुपये खर्च आला असून, केंद्र सरकारकडून हा प्लांट बसविण्यात आले आहे. सुरुवातीला हा प्लांट बसविण्यासाठी जागाच उपलब्ध नव्हती.



पर्णकुटी चौकातील राजीव गांधी रुग्णा लयातील लिक्विड ऑक्सिजन प्लांट तब्बल चार वर्षांनी कार्यान्वित झाले आहे. यासाठी दोन कोटी रुपये खर्च आला असून, केंद्र सरकारकडून हा प्लांट बसविण्यात आले आहे. सुरुवातीला हा प्लांट बसविण्यासाठी जागाच उपलब्ध नव्हती. त्यानंतर शेजारी असलेल्या महापालिकेच्या कर्नल यंग प्राथमिक विद्यालयाच्या आवारात दोन वर्षांपूर्वी हा ऑक्सिजन प्लांट बसविण्यात आले. त्यानंतर दोन वर्षांनी या प्लांटमध्ये लिक्विड ऑक्सिजन भरण्यात आले. त्यामुळे आता येथील लहान मुलांसाठी असलेल्या अतिदक्षता विभागात या ऑक्सिजनचा वापर केले जाणार आहे.राजीव गांधी रुग्णालय हे वडगाव शेरी विभागातील सर्वात मोठे रुग्णालय आहे. या ठिकाणी बाह्यरुग्ण विभाग, प्रसूतिगृह, बालकांचे लसीकरण, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (एनआयसीयू), डायलिसिस, फिजिओथेरपी, दंतचिकित्सा इत्यादी विभाग आहेत.

पूर्वी या रुग्णालयाच्या तिसऱ्या व चौथ्या मजल्यावर शंभर खाटांच्या कोविड केंद्राचा प्रस्ताव होता. त्यामुळे सुरुवातीला ८० खाटांचे ऑक्सिजन तर २० खाटांच्या व्हेंटिलेटर बेडची सोय करण्यात आली होती.

गांधी रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात दररोज साडेचारशे रुग्ण येतात. राजीव गांधी रुग्णालयात सध्या तीन स्त्रीरोगतज्ज्ञ, दोन बालरोगतज्ज्ञ कायमचे असून, राज्य सरकारचे बॉंडेड पाच डॉक्टर आले आहेत. कुटुंबनियोजन, लसीकरण, डायलिसिस, फिजिओथेरपी आदी सुविधा आहेत. केंद्र सरकारकडून सोशल कॉर्पोरेट स्पॉन्सिबल अर्थात 'सीएसआर' निधीतून ऑक्सिजन प्लांट आले होते. त्यापैकी नऊ मीटर जागा कर्नल यंग शाळेतील मिळाल्याने प्लांट बसविणे शक्य झाले.

### एजाज खान यांचे आंदोलन

» "राजीव गांधी हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजन प्लांट बसविण्यात येत नाही, तोपर्यंत हॉस्पिटलच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सामाजिक कार्यकर्ते एजाज रहमान खान हे धरणे आंदोलनाला बसले होते. येरवडा येथील नागरिकांच्या हितासाठी हे आंदोलन केले होते. स्थानिक नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच सामाजिक संघटनांनी या आंदोलनात सहभागी झाले होते.

> राजीव गांधी रुग्णालयात हवेतून ऑक्सिजन निर्मिती प्लांट बसविण्याची जबाबदारी महापालिका आरोग्य विभागाची होती. त्यांनी प्लांट बसविण्यासाठी मार्ग काढला. येथील कायमस्वरूपी ऑक्सिजन प्लांट भविष्यात रुग्णालयातील इतर विभागांना उपयोगी पडेल.
> - सुनील टिंगरे, आमदार

> राजीव गांधी रुग्णालयात बसविण्यात आलेले लिक्विड ऑक्सिजन केंद्र सरकारकडून मिळालेल्या चार ऑक्सिजन प्लांटपैकी एक आहे. ऑक्सिजन प्लांट राजीव गांधी रुग्णालयात बसविण्यात आल्यामुळे येथील लहान मुलांच्या अतिदक्षता विभागाला उपयोगी पडणार आहे. त्यामुळे ऑक्सिजन सिलिंडर संपले, सिलिंडरमधून ऑक्सिजनची गळती होते, अशा समस्या आता येणार नाहीत.
> - - डॉ. मनोज बगाडे, वैद्यकीय अधिकारी, स्वर्गीय भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय, येरवडा

# दहा वर्षांच्या विशेष मुलीच्या शोधासाठी तब्बल 500 पोलीस रस्त्यावर; सोशल मीडिया अन् पोलीस ठरले देवदूत

## आयुक्तांसह वरिष्ठ अधिकारी मदतीला धावले, डिलिव्हरी बॉयच्या सतर्कतेमुळे मुलगी आई-वडिलांच्या कुशीत

**पुणे | प्रतिनिधी**

सदर मुलगी विशेष प्रकारातील असल्याने पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले. तत्काळ या मुलीच्या शोधासाठी पथके तयार करण्यात आली. पोलिसांनी बिबवेवाडी, कात्रज परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन त्याची तपासणी सुरू केली. घराबाहेर पडल्यानंतर तिला घरी परतण्याचा रस्ता सापडला नाही. मुलगी गंगाधाम रस्ता, काकडे वस्ती, खडीमशिन चौकमार्गे कात्रज चौक परिसरात आली. यातील काही ठिकाणच्या फुटेजमध्ये ही मुलगी कात्रजकडे गेल्याचे दिसत होते. त्यानंतर ही मुलगी कात्रज परिसरात असल्याचे स्पष्ट झाले. एका ठिकाणच्या फुटेजमध्ये या मुलीसह एक



पुरुष संशयास्पदरित्या बोलताना दिसत होता मात्र, अन्य फुटेजमध्ये तो तिच्यासोबत दिसत नव्हता.

या मुलीचे अपहरण झाल्याचा संशय बळावल्याने शहरातील सर्व पोलीस ठाण्यांना संदेश पाठविण्यात आला. तत्काळ तिचे छायाचित्र असलेली एक पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित केली. त्यानंतर, इन्स्टाग्राम, फेसबुक आदी सोशल मीडियावर पोलीस अधिकाऱ्यांचे नंबर असलेली माहिती प्रसारित करण्यात आली. नागरिकांना या मुलीबाबत माहिती मिळाल्यास पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच, याबाबतची पत्रके चौकाचौकात वाटण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, उपायुक्त आर. राजा यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यास भेट दिली. ५०० पोलीस कर्मचारी रात्रभर मुलीचा शोध घेत होते. कात्रज परिसर पोलिसांनी पिंजून काढला. त्यांनी तपास पथकाला महत्त्वपूर्ण सूचना केल्या. गुन्हे शाखेच्या पथकांनीदेखील तपासाला सुरुवात केली. गुरुवारी दिवसभर शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर रात्री पोलिसांना एका डिलिव्हरी बॉयने फोन करून या मुलीबाबत माहिती कळवली. ही मुलगी कोंढवा येथील एनआयबीएम रस्त्यावर असल्याचे त्याने सांगितले.

### कोंढव्यात सापडली मुलगी

» डिलिव्हरी बॉय असलेल्या एका तरुणाने सदर मुलीला कोंढवा परिसरात पाहिले. त्याच्या तत्परतेमुळे मुलीचा शोध लागला. घरपोहोच खाद्यपदार्थ पोहचविणाऱ्या कंपनीतील कामगार असलेल्या सौरभ भाऊसाहेब गोसावी (वय २१) याने कोंढवा भागात गुरुवारी मध्यरात्री या दहा वर्षांच्या मुलीला पाहिले. मुलगी एकटी असल्याने त्याला संशय आला. त्याने त्वरित पोलिसांना या घटनेची माहिती दिली. कोंढवा पोलिसांनी मुलीला ताब्यात घेतले. चौकशीत मुलगी बिबवेवाडीतून बेपत्ता झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर मुलीला पालकांच्या ताब्यात देण्यात आले. मुलगी सुखरूप सापडल्याने पोलिसांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# नाशिक फाटा ते मोशी अंतरावर 3 ‘जक्शन-सब-वे’

## ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ च्या प्रकल्पाबाबत अधिकाऱ्यांची माहिती : आमदार लांडगे, आयुक्त सिंह अन् ‘एनएचएआय’ची बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

नाशिक फाटा ते खेड दरम्यान एलिव्हेटेड कॉरिडॉरचे काम सुरू झाल्यानंतर शहरातील सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना वाहतूक कोंडीचा त्रास होवू नये. या करिता कामाच्या पहिल्या टप्प्यात जय गणेश साम्राज्य स्पाईन रोड, भारतमाता चौक मोशी आणि भोसरी येथील वाहतुकीला अडथळा होवू नये या करिता तीनही प्रस्तावित जक्शन व सब-वेचे काम प्राधान्याने हाती घ्यावे, अशी सक्त सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिली आहे.



पुणे-नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड ८ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉरला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सकारात्मक पुढाकारामुळे या प्रकल्पासाठी सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या संदर्भातील प्रकल्पाची माहिती देण्याकरिता महापालिका भवन येथे बैठक घेण्यात आली.

यावेळी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रोजेक्ट मॅनेजर संजय कदम, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, सहशहर अभियंता प्रमोद ओंबासे, कार्यकारी अभियंता बापुसाहेब गायकवाड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### भैरवनाथ स्कूलजवळ अंडरपासची सूचना..

» प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू झाली असून, कामला गती देण्यासाठी महानगरपालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. यावेळी NHAI च्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. भोसरी, तळवडे, चिखली, मोशी याभागातील वाहतूक सक्षम होण्याच्या दृष्टीने अंडरपास आणि सब-वे तसेच, भोसरीत भैरवनाथ हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेय या ठिकाणी विद्यार्थी-पालकांच्या सोयीकरिता अंडरपासची व्यवस्था करावी, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला केली आहे.

“ नाशिक फाटा ते खेड या ३२ किलोमीटर लांबीच्या एलिव्हेडेट कॉरिडॉरमुळे पुणे, पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक पट्ट्यातील प्रमुख आर्थिक केंद्रांना जोडणारा दुवा निर्माण होणार आहे. या प्रकल्पामुळे नाशिक फाटा ते खेड अंतर अगदी काही मिनिटात पार करता येईल. तसेच, शहरातील तळवडे-चिखली-मोशी- भोसरी परिसरातील "ट्रॅफिक कोंडी" कायमची सुटणार आहे. काम सुरू असतानाही नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये. या करिता प्रशासनाने सर्व उपाययोजना कराव्यात, अशी सूचना केली आहे.

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा शानदार शुभारंभ

## लाडक्या भावाकडून रक्षाबंधनाची ओवाळणी मिळाल्याने महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिलांच्या ढोल आणि लेझीम पथकाचे सादरीकरण, उत्सवाच्या वातावरणात सजलेला आणि महिला भगिनींनी फुललेला शिवछत्रपती क्रीडानगरीचा परिसर, महिलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद आणि मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी महिलांना दिलेल्या शुभेच्छा... अशा उत्साहपूर्ण वातावरणात ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने’चा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे हीच भाऊ म्हणून प्रामाणिक इच्छा आहे आणि म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा अहेर मिळणार आहे, अशा भावपूर्ण शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या




म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछपत्रपती क्रीडानगरी येथे झालेल्या या सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बाल विकास मंत्री कु. आदिती तटकरे आदी उपस्थित होते.

आजचा दिवस लाडक्या बहिणींच्या आयुष्यातला आनंदाचा क्षण आहे असे नमूद करून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाखो बहिणी मिळाल्या याचा मनापासून आनंद आहे. त्यांचे प्रेम ही जीवनातील मोठी शिदोरी आहे. या योजनेसाठी पूर्ण वर्षाचे आर्थिक नियोजन करण्यात आले आहे. या दीड हजार रुपयांचे मोल गरजू बहिणींसाठी खूप आहे. त्यांना या रकमेतून कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासोबत आर्थिक उन्नती साधता येईल. आता मदतीसाठी कुणासमोर हात फैलावे लागणार नाही.

महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. काही महिलांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल. प्रत्येक पात्र भगिनीला योजनेचा लाभ दिला जाईल. लाखो बहिणींच्या खात्यात दर महिन्याला निश्चित रक्कम जाईल याचे खूप समाधान आहे, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

महिला भगिनींसाठी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला. भावालाही मदत करण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली. सर्वांच्या जीवनात सुखाचे क्षण यावे यासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. जनतेची सेवा हेच शासनाचे ध्येय असून प्रत्येक योजना यादृष्टीनेच गतीने राबविण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

महिला लखपती झालेल्या बघण्याची, त्यांना आत्मसन्मान मिळवून देण्याची शासनाची इच्छा असून महिलांच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी हात आखडता घेतला जाणार नाही, बहिणींच्या हितासाठी शासन आवश्यक ते सर्व प्रकारचे प्रयत्न करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातील महिलांना अधिक सक्षम, सबल करण्यासाठी त्यांना मान, सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याकरीता अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. या योजनेला माता-भागिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. आजपर्यंत १ कोटी ३ लाख रुपये माता-भागिनींच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार रुपये जमा करण्यात आले आहे. या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान, हसू दिसून येत आहे. भाऊबीज सणानिमित्ताने ओवाळणी म्हणून भेट दिली आहे.

### महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू - देवेंद्र फडणवीस

» राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भागीदारी असावी असा केंद्र आणि महाराष्ट्र शासनाचा प्रयत्न आहे. यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्थाही वेगाने वाढणार असून महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी मार्च २०२५ पर्यंतची तरतूद केली असून पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असेही ते म्हणाले.

# मोदी सरकारकडून पुणेकरांना मोठं गिफ्ट!

## विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या मार्गाला केंद्र सरकारने हिरवा कंदील



**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या मार्गाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या बैठकीत या मार्गाला मंजुरी देण्यात आली. हा प्रकल्प एकूण २ हजार ९५४ कोटी रुपयांचा असून, तो फेब्रुवारी २०२९ पर्यंत पूर्ण होईल.

स्वारगेट ते कात्रज या मार्गाला सार्वजनिक गुंतवणूक मंडळाने तत्त्वत: मंजुरी दिली होती. त्यानंतर हा प्रस्ताव आता केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात आला. त्यावर बैठकीत आता शिक्कामोर्तब झाल्या असून या मेट्रो मार्गाचे काम सुरू होणार आहे. मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातीलच हा विस्तारित मार्ग असणार आहे. हा संपूर्ण भुयारी मार्ग असेल आणि त्याची लांबी ५.४६ किलोमीटर असेल आणि तीन भूमिगत स्थानके या मार्गावर असतील. या प्रकल्पासाठी एकूण २ हजार ९५४ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.

स्वारगेट ते कात्रज या मेट्रो मार्गाचा प्रस्ताव महामेट्रोने राज्य सरकारकडे पाठवला होता. राज्य सरकारने त्याला मंजुरी देऊन तो केंद्र सरकारकडे पाठवला होता. दिल्लीत सार्वजनिक गुंतवणूक मंडळासोर महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी जानेवारी महिन्यात हा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला सार्वजनिक गुंतवणूक मंडळाने तत्त्वत: मंजुरी दिली. अखेर हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी केंद्रीय मंत्रिमंडळासमोर मांडण्यात आला.

### सल्लागार नियुक्ती डिसेंबरमध्येच

» महामेट्रोने या मार्गासाठी रचना सल्लागार नेमण्यासाठी निविदा गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात काढली. त्यात मार्गाची उभारणी, बोगद्यातील पर्यावरण नियंत्रण यंत्रणा, इमारतीची व्यवस्थापन यंत्रणा आणि स्थानकांची रचना यांची जबाबदारी रचना सल्लागाराकडे असणार आहे. ही निविदा मेट्रो मार्गाला मंजुरी मिळण्याआधीच काढण्यात आली असल्याने मंजुरी मिळाल्यानंतर तातडीने या मार्गाचे काम सुरू करता येणार आहे. मंजुरीनंतर रचना सल्लागार नेमण्याच्या प्रक्रियेचा वेळ यामुळे वाचणार आहे, असे सूत्रांनी सांगितले.

**स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्ग**

मार्ग – भुयारी

खर्च – २ हजार ९५४ कोटी रुपये

अंतर – ५.४६ किलोमीटर

स्थानके – मार्केट यार्ड, पद्मावती, कात्रज

### प्रस्तावित दैनंदिन प्रवासी संख्या

- » वर्ष २०३७ – १.५८ लाख
- » वर्ष २०४७ – १.८७ लाख
- » वर्ष २०५७ – १.९७ लाख

# निवासी डॉक्टरांच्या संपामुळे रुग्णसेवेला फटका

## ससून रुग्णालयात 566 निवासी डॉक्टर : 180 डॉक्टर अत्यावश्यक सेवेसाठी कार्यरत, उरलेले संपावर




**पुणे | प्रतिनिधी**

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांनी पुकारलेल्या संपाचा शुक्रवारी चौथा दिवस होता. या संपात आता एमबीबीएस पदवीच्या अंतर्वासित विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला आहे. यामुळे ससून सर्वोपचार रुग्णालयातील रुग्णसेवेला मोठा फटका बसला आहे. रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागातील रुग्णांची संख्या कमी होण्यासोबत शस्त्रक्रियांची संख्याही कमी झाली आहे.

कोलकत्यातील वैद्यकीय महाविद्यालयात निवासी महिला डॉक्टरचा बलात्कार करून खून करण्यात आला होता. या घटनेनंतर डॉक्टरांच्या सुरक्षिततेच्या मुद्द्यावर देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांतील निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. संपाचा शुक्रवारी चौथा दिवस होता. या संपात बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांनी सहभाग घेतला आहे. याचबरोबर शहरातील खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरही सहभागी झाले आहेत. यामुळे एकूणच वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न सर्व रुग्णालयांत रुग्णसेवेला मोठा फटका बसू लागला आहे.

ससून रुग्णालयात ५६६ निवासी डॉक्टर आहेत. त्यांपैकी १८० डॉक्टर अत्यावश्यक सेवेसाठी कार्यरत असून, उरलेले संपावर आहेत. आता एमबीबीएसच्या २५० अंतर्वासित विद्यार्थ्यांनी संपात सहभाग घेतला आहे. त्यामुळे रुग्णालयातील रुग्णसेवेवर गंभीर परिणाम झाला आहे. बाह्यरुग्ण विभागातील रुग्णसंख्या कमी झालेली आहे. याच वेळी रुग्णालयातील शस्त्रक्रियांची संख्याही कमी झाली आहे.

### शैक्षणिक कामकाजावर परिणाम

» बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांनी संपात सहभाग घेतला आहे. त्यामुळे ससून रुग्णालयातील रुग्णसेवेवर परिणाम होऊ लागला आहे. त्यामुळे शिक्षकांच्या मदतीने रुग्णसेवा सुरू ठेवण्याची कसरत महाविद्यालय प्रशासनाला करावी लागत आहे. याचा परिणाम होऊन महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाज सध्या ठप्प झाले आहे.

**संपात सहभाग**

एकूण निवासी डॉक्टर – ५६६

संपात सहभागी निवासी डॉक्टर – ३८६

संपात सहभागी एमबीबीएस अंतर्वासित – २५०

**ससूनमधील रुग्णसेवा**

तारीख – मोठ्या शस्त्रक्रिया – छोट्या शस्त्रक्रिया

१३ ऑगस्ट – ४२ – ६६

१४ ऑगस्ट – ३१ – ८०

१६ ऑगस्ट (दुपारी २ पर्यंत) – २१ – ३३

“ निवासी डॉक्टरांच्या संपामुळे बाह्यरुग्ण विभागासह इतर सेवांवर परिणाम झाला आहे. अत्यावश्यक विभागातील सेवा सुरळीतपणे सुरू आहे. याचबरोबर अत्यावश्यक शस्त्रक्रियाही व्यवस्थितपणे सुरू आहेत. रुग्णसेवेसाठी महाविद्यालयातील शिक्षकांची मदत घेतली जात आहे.

**- डॉ. एकनाथ पवार, अधिष्ठाता, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून रुग्णालय.**